नि.फौ.ख.क्रं.६७/२०२२.
सरकार वि. प्रभाकर.
**नि.क्रं.३१ खाली.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ चा शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. डी. एल. देशमुख यांचेमार्फत सुरू.**

५. मी पदवीधर आहे. माझी पत्नी सुध्दा पदवीधर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी जवळपास ०४.०० वाजता फोन आला होता. माझ्या पत्नीच्या सांगण्याप्रमाणे जी घटना झाली ती ०२.०० वाजता झाली. या दोन तासाच्या वेळामध्ये माझ्या पत्नीने कोणाशीही संपर्क केला नाही व ती पोलीस ठाण्याला गेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाणे हे घटनास्थळपासुन वीस ते तीस पाऊलावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दुकानामध्ये माझी पत्नी काम करत होती व त्याच्या बाजुला दुकाने आहेत व ते चालु होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पत्नीने आजुबाजुच्या दुकानदारांना ०४.०० वाजेपर्यंत सांगीतले नाही. मला फोन आल्यानंतर मी जवळपास ०४.१५ वाजता दुकानात पोहोचलो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीसोबत दुकानात भांडण केले होते.

६. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीवर आरोपीने दोन ते तीन साड्या चोरल्याचा आरोप लावला होता म्हणुन मी भांडण केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पत्नीच्या पैशाचा हिशोब आरोपीला मागीतला होता. माझ्या पत्नीला आरोपीकडुन ४०० ते ४५० रूपये घ्यायचे होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी मी आरोपीकडुन ४५० रूपये हिशोबाचे घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, पैसे घेतल्यानंतर मी आरोपीला धमकी दिली की, मै तुझे देख लुगाँ. मी दुकानातून निघाल्यानंतर त्वरीत पोलीस ठाण्याला गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घरी गेल्यानंतर दोन ते तीन तासानंतर पोलीस ठाण्याला गेले होतो.

**प्रश्न–** दुकान पोलीस ठाण्याच्या बाजुला असतांना तुम्ही तात्काळ पोलीस ठाण्याला का गेले नाही?
**उत्तर–** मी जेव्हा दुकानात आला तेव्हा आरोपी व माझी पत्नी तेथे होती. मी माझ्या पत्नीला विचारले की, काय झाले. तीने काही सांगीतले नाही, ती रडत होती. त्यानंतर मी तिला घरी घेवुन गेलो.

७. हे म्हणणे खरे नाही की, मी तात्काळ रिपोर्ट दिला नाही कारण आरोपीने पत्नीला छेडले म्हणुन मी कहाणी तयार केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीवर आरोपीने साड्या चोरी केल्याचा आरोप केला होता म्हणुन पैसे उकडण्याकरीता आरोप केला. हे म्हणणे खरे नाही की,

घटनेच्या दिवशी पोलीस ठाण्याला जाण्याअगोदर आरोपीला ५० हजार रूपयाची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, ती मागणी आरोपीने पूर्ण न केल्यामुळे मी आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दिली.

८. हे म्हणणे खरे नाही की, दुपारी ०२.०० वाजता दुकानामध्ये ग्राहक नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, ती आणि दुकान मालक बसले होते, त्यावेळी दुकान मालकाने म्हटले की, "निचे के गलीचे उप्पर के रूम मे रखनॉ''. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर तिने सांगीतले की, "ती त्याच्या सांगण्याप्रमाणे ते गालीचे घेवुन वरती गेली आणि तेथील सामान हटवुन जागा केली''. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आरोपी दुकान मालक तिच्या मागे मागे आला, त्याने म्हटले की, "इथे बसं'', तर माझ्या पत्नीने म्हटले की, "इथे बसुन काय करायचे?'', तर आरोपीने तिला म्हटले की, "तु मुझे अच्छी लगती है. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आरोपीने तिचे दोन्ही हात पकडुन तिच्या ओठाचे चुंबन घेतले व छातीवरून हात फिरवत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर तिने खाली उतरण्याचा प्रयत्न केला, तर आरोपीने तिला म्हटले की, ''तुझ्या पतीला तुझ्यापासुन मुलं पाहिजे, तर मी तुझे पाय भारी करतो'', (मी तुला गर्भवती करतो) "तुझ्या पतीला मुलं पाहिजे आणि सासु सास–याला नातवंड खेळायला पाहिजे'', असे आरोपीने तिला म्हटले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझी पत्नी जागा करून खाली उतरली.

९. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगीतल्याप्रमाणे कोणतेही कृत्य आरोपीने माझ्या पत्नीसोबत केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कहाणी बनवुन पत्नीला खोटी फिर्याद देण्यास लावले. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी माझ्या पत्नीने न्यायालयात साक्ष दिली त्या दिवशी मी तिच्यासोबत आलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी सुध्दा मी आरोपीला ३० हजार रूपये आपसात करण्याकरीता मागीतले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने पैसे न दिल्यामुळे माझ्या पत्नीने साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला फसविण्याकरीता आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
| Sd/– | Sd/– |
| (अ. वि. पंडित) | (अ. वि. पंडित) |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., पवनी. |
| १९/०१/२०२६ | १९/०१/२०२६ |